महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत,**
MSETCL Registration No.CIN NO. U40109MH2005SGCI153646
**प्रेषक: - कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,**
अउदा संवसु विभाग, एम.सेक्टर, प्लॉट नं.३२, भारत पेट्रोलिअम जवळ,
१३२ के.व्हि.उपकेंद्र नविन जळगांव ता.जि.जळगांव - ४२५००३
दुरध्वनी क.०२५७-२२१२७६९ (कार्यालय)
Email id:- ee5210@mahatransco.in & dymgrhr5210@mahatransco.in

जावक क.काअ/अऊदावि/जळगांव/ मासं/ No 01127 दि.: 16 AUG 2025

| महापारेषण | ITI (Electrician) उमेदवारांसाठी सुचना |
|---|---|

ITI (Electrician) उत्तीर्ण उमेदवारांना याव्दारे सुचित करण्यात येते की, म.रा.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अऊदा संवसु विभाग, जळगांव कार्यालयामार्फत सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी सांघीक कार्यालय मुंबई यांचे मासं परिपत्रक क.२३०२/१०१ दि.२२.०६.२०२० नुसार शिकाऊ उमेदवार (Apprentice) उमेदवारांना एक वर्षा च्या प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन करारबध्द करण्यात येणार आहे.

०१. एकुण पदांची संख्या :- ३७

०२. शैक्षणीक पात्रता :- इयत्ता १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा आयटीआय इलेक्ट्रीशिअन (वीजतंत्री) उत्तीर्ण केल्याचे सर्व सेमीस्टर चे एकत्रित गुणपत्रक, आधारकार्ड सह, (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) अपलोड करणे अत्यावश्यक आहे.

०३. अर्जदाराने महाराष्ट्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या वेबासाईटवर नोंदणी करणे बंधनकारक असुन दि.११.०८.२०२५ ते दि.१४.०८.२०२५ रात्री.२३.५९ पर्यत या कालावधीत https://apprenticeshipindia.org/apprenticeship/opportunity या लिंकवरून (Establishment Code - E09202700073) या आस्थापनेवर आवश्यक माहीती नमुद करून सर्व कागदपत्रांसोबत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद कालावधी नंतर अर्ज करणा-या कोणत्याही उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

०४. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) सादर करणे आवश्यक आहे.

०५. कामाचे ठिकाण :- जळगांव जिल्हयातील अउदा संवसु विभाग महापारेषण जळगाव अंतर्गत २२० के.व्ही./ १३२ के.व्हि.उपकेंद्रात कोठेही.

०६. वयोमर्यादा :- वर्षे १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिताक्षम)

०७. विद्यावेतन :- शासन व कंपनी नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

०८. सदरील प्रकियेमध्ये केवळ जळगाव जिल्यातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

०९. प्रशिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा.

१०. शिकाऊ प्रतिबध्दता प्रक्रिया दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

११. वरील कागदपत्रे नमुद केलेल्या वेबसाईटवर (सुस्पष्ट स्कॅन कॉपी) अपलोड न केल्यास उमेदवाराचा पुढील प्रकियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेल व्दारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अशंतः बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तकार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सही
कार्यकारी अभियंता
अऊदा संवसु विभाग, जळगांव

कृपया वरील रेषेखालील मजकुर छापण्यात येऊ नये.

कार्यकारी अभियंता
अऊदा संवसु विभाग, जळगांव